



दैनिक लोकआरंभ

लोकक्रांतीचा आरंभ

LOK AARAMBH

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

dainiklokaarambh@gmail.com

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | बुधवार १ जानेवारी २०२५ | अंक २३ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर


# वाल्मिक कराडचा पाय खोलात १४ दिवसाची पोलीस कोठडी

बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी सीआयडी तपासाला प्रचंड वेग आला आहे. या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड हा आज स्वतःहून पुण्याच्या सीआयडी कार्यालयात सरेंडर झाला. यानंतर नियमानुसार आरोपी वाल्मिक कराड याचं मेडिकल करण्यात आलं. त्यानंतर त्याला तातडीने बीडच्या केज कोर्टात आज रात्री उशिरा हजर करण्यात आलं. यावेळी आरोपीच्या रिमांडबाबत सुनावणी झाली. यावेळी सरकारी वकील जे. बी. शिंदे यांनी वाल्मिक कराडला १५ दिवसांची पोलीस कोठडी देण्याचा जोरदार युक्तिवाद केला. तर वाल्मिक कराड सीआयडीला शरण आले आहेत. मग जामीन मिळायला हवा, असा युक्तिवाद कराडचे वकील अशोक कवडे यांनी केला आहे. दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकल्यानंतर कोर्टाने वाल्मिक कराडला १४ दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे. रात्री १० वाजेनंतर केजच्या कोर्टात दोन्ही बाजूच्या वकिलांनी जोरदार युक्तिवाद केला. हा युक्तिवाद ऐकण्यासाठी कोर्टाच्या बाहेर कराड समर्थक आणि विरोधकांची तुफान गर्दी झाली होती. या पार्श्वभूमीवर कोर्ट परिसरात प्रचंड बंदोबस्त ठेवण्यात आला होता. रात्री ११ वाजून २० मि



निटांनी दोन्ही बाजूचा युक्तिवाद संपला. त्यानंतर कोर्टाने हा मोठा निर्णय दिला आहे. सीआयडीने १५ दिवसाची कोठडी मागितली होती. पण कोर्टाने १४ दिवसाची कोठडी दिली आहे. सीआयडीचं हे मोठं यश असल्याचं सांगितलं जात आहे. कराडच्या कोठडीशिवाय घुलेचा शोध घेणं कठीण आहे. हत्या आणि खंडणीच्या गुन्ह्यात कराडचा सहभाग आहे का हे तपासायचे आहे. मोबाईलवरचं संभाषण हे कराडचंच आहे का हे तपासायचं आहे. तपासासाठी कराडला १५ दिवसांची पोलीस कोठडी द्या संतोष देशमुख हत्येत वाल्मिक कराडचा हात आहे का? हे तपासायचं आहे. सुदर्शन घुले हा वाल्मिक कराडच्या सांगण्यावरून काम करायचा. वाल्मिक कराडने आणखी काही गुन्हे करून दहशत पसरवली आहे. काम बंद करू, हातपाय तोडू अशी धमकी सुदर्शन घुलेने दिली होती कराडचे वकील अशोक कवडे यांचा युक्तिवाद फक्त खंडणी प्रकरणाचा आरोप आहे कराडा हा गरीब सामाजिक कार्यकर्ता आहे कराडांना या प्रकरणात जाणूबुजून अडकवलं जात आहे. राजकीय द्वेषापोटी अडकवण्याचा प्रयत्न २ कोटीची खंडणी मागितल्याचा आरोप आहे, त्यातील किती पैसे दिले हे साांगा २ कोटींची खंडणी मागितली हा फक्त आरोप आहे आवाजाचे नमूने द्यायला तयार आहोत, पण कोठडी नको कराड सरेंडर झाले, आता जामीन द्या मीडिया ट्रायल पाहून कोर्टाने निर्णय घेऊ नये कराडला न्यायालयीन कोठडी द्यावी सर्व पेपर तुमच्याकडे आहे, तुम्ही तपास करा. ३०८ हे कलम चुकीच्या पद्धतीने लावलं जात आहे. कोर्टाबाहेर दमदाटी सीआयडी पथक आणि बीड पोलीस आरोपी वाल्मिक कराडला घेऊन केजमध्ये दाखल होत नाही त्याआधीच केज कोर्टाबाहेर मोठी गर्दी जम लेली होती. वाल्मिक कराडच्या समर्थकांनी आणि त्याच्या विरोधकांनी केज कोर्टाबाहेर मोठी गर्दी केलेली बघायला मिळाली. विशेष म्हणजे केज कोर्ट परिसरात त्याआधी वाल्मिक कराडच्या समर्थकांनी कोर्ट परिसरातील वाहनं बाहेर काढण्यावरुन कोर्ट कर्मचा-यांना दमदाटी केल्याचा प्रकारही समोर आला होता. यानंतर थोड्या वेळाने सुनावणीच्या पार्श्वभूमीवर वाल्मिक कराडचे समर्थक आणि विरोधकांनी केज कोर्टाबाहेर मोठी गर्दी केली. केज कोर्ट परिसरात पोलिसांचा लाठीचार्ज वाल्मिक कराड हा केज कोर्ट परिसरात सुनावणीसाठी दाखल झाल्यास कोणताही अनुचित प्रकार घडू नये, याची काळजी पोलिसांकडून घेण्यात आली. त्यामुळे वाल्मिक कराड कोर्ट परिसरात दाखल होण्याआधी पोलिसांनी केज कोर्ट परिसरात जमलेल्या गर्दीला हटवण्यासाठी सौम्य लाठीचार्ज केला. सर्व गर्दी दूर बाजूला सारण्यात आली. त्यानंतर थोड्या वेळाने वाल्मिक कराडला तिथे आणण्यात आलं. केज कोर्ट परिसरात १०० पेक्षा जास्त पोलीस विशेष म्हणजे सुनावणीच्या वेळी केज कोर्टाबाहेर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात होता. तब्बल ७ पोलीस अधिकारी आणि ४७ पोलीस कर्मचारी, २ ठउझ प्लॅटून आणि १ डठझ प्लॅटून असा जवळपास १०० ते १२५ पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला. विशेष म्हणजे या काळात कोर्ट परिसरात नागरिकांना एकत्र येण्यास मनाई करण्यात आली.

## चकलांब्याचे अंमलदार तिपाले यांची उचलबांगडी



बीड दि.३१ (प्रतिनिधी): पोलीस अधिक्षक म्हणून नव्याने पदभार घेतलेल्या नवनीत कॉवत यांनी अखेर गोदापात्राकडे लक्ष केंद्रित करण्यास सुरुवात केली आहे. चकलांबा पोलीस ठाण्यातील अंमलदार आणि सध्या गेवराईच्या उपविभागीय कार्यालयात संलग्न असलेले अशोक तिपाले यांची उचलबांगडी करण्यात आली. काल रात्री उशिरा ही ऑर्डर काढण्यात आली असून त्यांची बर्दपूरला बदली झाली आहे. पोलीस अधिक्षक म्हणून नवनीत कॉवत यांनी पदभार घेतल्यापासून ऍक्शन मोडमध्ये येतं अनेक कारवायांना हात घालण्यास सुरुवात केली. चकलांबा पोलीस ठाण्यातील अंमलदार असलेल्या अशोक तिपाले यांच्याबाबतीत तक्रारी असल्याने त्यांची बदली करण्यात आल्याची माहिती आहे.अशोक तिपाले हे गेवराईच्या उपविभागीय कार्यालयात संलग्न होते. गेवराईचे उपविभागीय अधिकारी श्री.राजगुरु यांच्याकडे ते मागील काही दिवसांपासून काम करत होते. गोदापात्रात माफियासोबत त्यांचे संबंध असल्यामुळे पोलीस अधीक्षकांनी या कारवाईच्या माध्यमातून मोठा इशारा दिल्याचे मानले जाते. त्यामुळे आता आणखीन कोणत्या कोणत्या कर्मचाऱ्यांची विकेट जाते का? याच्या चर्चा देखील सुरु झाल्या असून तिपाले यांना बर्दपूर पोलीस ठाण्यात प्रशासकीय कारण देत बदली करण्यात आली.त्यामुळे गोदापात्रात खळबळ उडाली आहे.

## करा‍ड सरेंडर, दमानिया आक्रमक



बीड : जिल्ह्यातील मस्साजोगमधील सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येमुळे बीडसह संपूर्ण महाराष्ट्राचे राजकारण तापले आहे. या हत्येला २२ उलटूनही मुख्य आरोपींना अटक करण्यात अपयश येत असल्याने सर्वच स्तरांतून संताप व्यक्त केला जात होता. त्यातच काही वेळापूर्वीच एक मोठी अपडेट घडली. बीडच्या खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड अखेर सीआयडीला शरण आला आहे. यानंतर पुन्हा एकदा आरोप-प्रत्यारोपांचे राजकारण सुरू झाले आहे. अशातच आता सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी मोठा दावा केला आहे. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येमागचा मास्टरमाईंड वाल्मिक कराड असून तो मंत्री धनंजय मुंडे यांच्या जवळचा असल्याचा गंभीर आरोप विरोधकांकडून सातत्याने केला जात आहे. पण आता सीआयडी आणि बीड पोलिसांनी फास आवळल्यानंतर कराड हा पुण्यात सीआयडी समोर शरण आला आहे. त्याची आता सीआयडीमार्फत कसून चौकशी केली जाणार असून पुढील काही तासांतच त्याला न्यायालयात हजर केले जाण्याची शक्यता आहे.

## संतोष देशमुख कुटुंबीय आणि गावकऱ्यांचा सामूहिक जलसमाधीचा इशारा



केज दि.३१ (प्रतिनिधी) संतोष देशमुख यांची हत्येला आज २१ दिवस झाले. मुख्य आरोपी अटक करण्यात तपास यंत्रणेला अपयश आले असल्याने संतप्त नातेवाईक आणि गावकऱ्यांनी उद्या (दि.१) जानेवारी रोजी सामूहिक जलसमाधी घेणार असल्याचे पत्र तहसीलदार यांना दिले आहे. त्यामुळे खळबळ उडाली आहे. बीड जिल्ह्यातील मस्साजोग ता. केज येथील सरपंच संतोष पंडीतराव देशमुख यांचे टोल नाक्यावरून अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली होती. या घटनेला २२ दिवस उलटून देखील संशयित आरोपी अटक करण्यात तपास यंत्रनेला अपयश आलेले आहे. त्यामुळे दि. १ जानेवारी २०२५ रोजी संतोष देशमुख यांच्या कुटुंबातील सदस्य आणि गावकरी हे मस्साजोग येथील तलावात जलसमाधी घेणार असल्याचे निवेदन गावकऱ्यांनी आज दि. ३१ डिसेंबर रोजी तहसीलदार केज यांना दिले आहे.

## केजमध्ये वकीलाने सख्ख्या भावाकडे मागितली २० लाखाची खंडणी




केज दि.३१ (प्रतिनिधी): केज येथे घरगुती प्लॉटिंगच्या वादातून पेशाने वकील असलेल्या एका भावाने चक्क त्याच्या सख्ख्या भावाकडे २० लाखांची खंडणी मागिल्याचा प्रकार समोर आला आहे. त्याचबरोबर खंडणी न दिल्यास प्लॉटिंगच्या व्यवहार होऊ देणार नाही, अशीही धमकी देत प्लॉटच्या भोवती केलेले वॉल कंपाऊंड पाडून सुमारे २.५ लाख रुपयांचे नुकसान केले. याबाबतची अधिक माहिती अशी की, केज येथील जुनेद शाकीर शेख यांची केज येथील जुन्या दूध डेअरीजवळ प्लॉट आहे. या प्लॉटला त्यांनी सिमेंटचे खांब उभे करून सिमेंटच्या प्लेट्स लावून वॉल कंपाऊंड बांधलेली आहे. त्यांचा मोठा भाऊ सईद शाकेर शेख याने त्यांना यापूर्वी फोनवर व नातेवाईकांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत प्लॉटींग मधील १० टक्के जमीन दे. किंवा २० लाख दे. अशी मागणी केली होती. तसेच तू जर पैसे दिले नाही. तर प्लॉटींगमधील प्लॉटची विक्री करू देणार नाही.

## कुणालाही सोडणार नाही-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

बीड येथील मस्साजोग गावचे माजी सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबरला खून करण्यात आला. या हत्या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय असलेले वाल्मिक कराड यांच्यावर आरोप केला जात आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर वाल्मिक कराड फरार होता. मात्र आज २२ दिवसांनंतर वाल्मिक कराड हा पुण्यातील सीआयडीच्या कार्यालयात शरण आला. आता यावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मी पहिल्या दिवसापासून सां-




गतोय की, बीडच्या प्रकरणामध्ये कोणालाही आम्ही सोडणार नाही. ज्याचा ज्याचा संबंध आढळेल त्या प्रत्येकावर कारवाई करण्यात येईल. अतिशय कडक कारवाई करण्यात येईल. गुंडांचे राज्य आम्ही चालू देणार नाही. कोणालाही अशा प्रकारे हिंसा करता येणार नाही. खंडणी मागता येणार नाही. यादृष्टी-ने अतिशय गतिशील तपास केलेला आहे. त्यामुळेच आज वाल्मिक कराडला शरणागती पत्करावी लागली आहे. आता हत्येतले जे आरोपी फरार आहेत, त्यांना पकडण्याकरता वेगवेगळ्या टीम्स कामी लागलेल्या आहेत. कुठलाही आरोपी आम्ही सोडणार नाही, सगळ्यांना शोधून काढू, असे त्यांनी म्हटले. ते पुढे म्हणाले की, आज स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या बंधूंशी माजी फोनवर चर्चा झाली आहे. त्यांनाही मी आश्वासन दिले आहे की, तुम्ही काळजी करू नका. काहीही झाले तरी सगळे दोषी शोधून जोपर्यंत ते फासावर लटकवत नाही, तोपर्यंत पोलीस कारवाई करतील, असेही त्यांनी म्हट-ले. तर वाल्मिक कराडवर ३०२ चा गुन्हा दाखल होणार का? असे विचारले असता ते म्हणाले

# वाल्मीक कराड सरेंडर...!

## संतोष देशमुख हत्या प्रकरणात मोठी घडामोड;लवकरच सत्य बाहेर येण्याची शक्यता?

बीड । प्रतिनिधी संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा तपास सीआयडीकडे वर्ग केल्यानंतर वेगाने तपास सुरु झाला आहे. या प्रकरणात मुख्य आरोपी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वाल्मीक कराड यांनी आज पुण्यात सीआयडी कार्यालयात शरणागती पत्करली आहे. मंगळवार, ३१ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजता त्यांनी सीआयडीच्या अधिकाऱ्यांसमोर आत्मसमर्पण केले. सीआयडीने तपासाच्या चौकटीत वाल्मीक कराड याच्या निकटवर्तीयांची कसून चौकशी



केली होती. तसेच, त्यांचे पासपोर्ट रद्द करण्याची शिफारस केली होती. राज्य सरकारच्या आदेशानुसार, कराड यांची सर्व बँक खाती गोठवण्यात आली होती. या सर्व घटनांमुळे कराड यांच्यावर दबाव वाढत गेला. वाल्मीक कराड आजच शरण येणार असल्याच्या चर्चेमुळे सीआयडी कार्यालयासमोर समर्थकांची मोठी गर्दी झाली होती. कराड समर्थकांनी हा गुन्हा खोटा असल्याचा दावा करत निषेध व्यक्त केला. कराड हे निर्दोष असून त्यांच्यावर खोटे आरोप लावण्यात आले आहेत, असे समर्थकांनी म्हटले आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मीक कराड यांचे नाव मास्टरमाईंड म्हणून घेतले जात होते. त्यांच्या अटकेनंतर तपासाला अधिक वेग येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. याआधी या प्रकरणात चार जणांना अटक करण्यात आले असून, कराड यांना ताब्यात घेतल्यानंतर पुढील कारवाईचे संकेत सीआयडीने दिले आहेत.या महत्त्वाच्या घटनाक्रमामुळे संतोष देशमुख हत्या प्रकरणात लवकरच सत्य बाहेर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे

### गुन्हेगार स्वतः सरेंडर होत असेल, मग पोलिस यंत्रणा काय काम करतेय?

बीड : वाल्मिक कराड अखेर पुण्यात सीआयडीला शरण गेला आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात तो मुख्य मास्टरमाइंड असल्याचा आरोप होत आहे. खंडणी प्रकरणात वाल्मिक कराड आरोपी होता. त्या गुन्ह्यात तो शरण गेल्याची माहिती आहे. वाल्मिक कराडच्या अटकेनंतर संतोष देशमुख यांची कन्या वैभवी देशमुखने प्रतिक्रिया दिली असून आम्हाला लवकरात लवकर न्याय मिळाला पाहिजे हीच मागणी आहे. पोलिस यंत्रणा काम करतेय मग इतका वेळ का लागतोय?. गुन्हेगार स्वतः सरेंडर होत असेल, मग पोलीस यंत्रणा काय काम करतेय?. आरोपींना पकडायला इतका वेळ का लागतोय? मग, आम्हाला न्याय कसा आणि कधी मिळणार? असे प्रश्न वैभवी देशमुखने विचारले आहेत. माझ्या वडिलांची ज्यांनी क्रूर हत्या केली, त्यांना अरेस्ट करा. जे तीन आरोपी फरार आहेत, त्यांना अटक करा. लवकरात लवकर न्याय द्या अशी मागणी वैभवी देशमुखने केलीय. वाल्मिक कराडने खंडणी प्रकरणात शरणागती पत्करलीय, असे पत्रकारांनी वैभवीला विचारले, त्यावर ती म्हणाली की आम्हाला एवढच वाटतय की, ज्यांनी माझ्या वडिलांची हत्या केली, त्यांच्यावर कारवाई करा. वडिल पुन्हा आणू शकत नाही. पण त्यांचे बलिदान व्यर्थ जाता कामा नये.

### वाल्मिकचा व्हिडीओ व्हायरल

दरम्यान, शरणागती पत्करण्यापूर्वी वाल्मिकीने एक व्हिडीओ शेअर करून आपला संतोष देशमुख हत्या प्रकरणाशी संबंध नसल्याचा दावा केला आहे. मला अटकपूर्वचा अधिकार असताना मी सीआयडीसमोर हजर होत आहे. संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना अटक करावी, फाशी द्यावी. राजकीय कारणासाठी माझं नाव घेऊ नये. या प्रकरणात मी जर दोषी असेल तर मला शिक्षा द्यावी, असं वाल्मिक कराडने म्हटलं आहे.

### वाल्मिकवर हत्येचा गुन्हा दाखल करावा

वाल्मिक कराड हा संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मास्टरमाइंड असल्याचं सांगितलं जात आहे. या प्रकरणात वाल्मिक कराडविरोधात गुन्हा दाखल करण्यात यावा. त्याला हत्याकांडातील आरोपी करण्यात यावं, अशी मागणी विरोधकांनी केली आहे. त्यामुळे सीआयडी वाल्मिक कराडवर हत्येचा गुन्हा दाखल करणार का? असा सवाल करण्यात येत आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
बुधवार १ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

## नवे वर्ष नवे संकल्प

कोणत्याही नवीन कार्याची सुरुवात करताना श्री गणेशाचे नमन केले जाते, जिथे वातावरणात शुद्धता पावित्र्य आणि मांगल्य आपोआपच निर्माण होते. अशीच सुरुवात येर्णाया नवीन वर्षाची करायला हरकत नाही. घडून गेलेल्या चांगल्या वाईट गोष्टी मधून सकारात्मक विचार घेवून पुढे जाता आलं पाहिजे. भूतकाळ आणि भविष्यकाळ यामध्ये न रमता वर्तमानात जगता आलं पाहिजे. नवे वर्ष म्हणजे नवी संकल्पना नवे विचार जोपासून आपल्या मध्ये सकारात्मकतेची ऊर्जा निर्माण व्हायला हवी, यासाठी मुळात आपण स्वतः स्वतःला बदलल पाहिजे असं मला वाटतं. आपल्या कोणत्या विचारातून, कृतीमधून आपल्याला आनंद मिळेल आणि इतर लोकं प्रेरित होतील असे विचार आत्मसात केले पाहिजेत. अमुक तमुक व्यक्तीने असं केलं तर मी त्याच्या सारखं किंवा त्याच्या पेक्षा जास्त कसं चांगलं करेन हा विचार स्पर्धात्मक वृत्ती दर्शवणारा असेन यापेक्षा मी कोणती गोष्ट मनापासून चांगली करू शकेल यावर विचार केला तर नक्कीच नवा बदल घडू शकतो. ज्याप्रमाणे एक फूल आपलं नावीन्य आणि वेगळेपण जपून आपली ओळख निर्माण करतं तसच काहीसं म्हणा ना. याने तसं केलं...त्याने असं केलं...ही अशीच आहे... तो ऐकत नाही...हे सगळे विचार अगदी सामान्य. माणसाला असामान्य होऊन जगता आलं पाहिजे. विचारांचे स्वातंत्र्य प्रत्येक व्यक्तीला आहे. हा...फक्त चांगला विचार करून न थांबता तो आत्मसात करून प्रत्यक्षात उतरवण्यासाठी प्रयत्न करणे निश्चितच आहे. यासाठी मनाची स्थिरता महत्त्वाची. बौद्धिक विचार आणि मनाचा तोल यांचा म ेळ जमला की सर्व गोष्टी सोप्या होऊन जातात. यासाठी आपल्या भावनांना सुद्धा एक प्रकारची मर्यादा असावी. या त्रासातून, या दुःखांतून मी जात असेल तर समोरच्याने का नाही जावं ही भावना माणसाला माणसापासून दूर करते. समोरचा व्यक्ति थांबत असेल अडखळत असेल तर आपल्या परीने त्याला सावरता यायला हवं, शेवटी सांभाळणं आणि सावरणं ही सुद्धा एक कलाच आहे आणि ही कला जो जपेल तोच खरा कलाकार होऊ शकतो. काळ आणि वेळ दोन्ही मध्ये कालांतराने बदल होतोय अशा परिस्थितीत आपण आपली ओळख असणारी अर्थातच आपली संस्कृती आपली परंपरा जपून आपले विचार सुद्धा बदलण्याचा निश्चितच प्रयत्न केला पाहिजे. साने गुरुजींची, ङ्गखरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावेङ्घ ही कविता आपल्याला माणुसकीचा धडा शिकवून जाते. आपला प्रत्येक क्षण आपल्या साठी महत्त्वाचा आहे तो असा भरभरून जगून, आनंद घेवून जीवनाचे खरे कलाकार होऊन दाखवू.




# नवी मुंबई विमानतळ विकासाचे नवे पर्व

छत्रपती शिवाजी महाराज मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून झेपावलेले इंडिगो एअरलाइन्सचे ए३२०फ विमान रविवारी दुपारी १.४० वाजता नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर विसावले. पहिले व्यावसायिक विमान यशस्वीपणे उतरवण्यात आल्याने मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील ताण कमी करण्यासाठी आणि नवी मुंबईच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले विमानतळ आता लोकांना सेवा देण्यासाठी सज्ज झाले आहे. अदानी एअरपोर्ट होल्डिंग लिमिटेडचे समूह मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण बन्सल यांनी दिलेल्या माहितीनुसार, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून (एनएमआयए) लवकरच सेवा सुरू करण्यासाठी गेल्या काही महिन्यांपासून वेगाने काम सुरू आहे. नवी मुंबई विमानतळावरून व्यावसायिक सेवांना मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून सुरुवात होणार आहे. विमानतळाचे विधिवत उद्घाटन १७ एप्रिल २०२५ रोजी केले जाणार आहे. उद्घाटन झाल्यानंतर आम्ही प्रवाशांच्या सेवेसाठी सज्ज असू. एरोड्रोमच्या परवानगीसाठी आम्ही ६ फेब्रुवारी रोजी अर्ज करणार आहोत. ७० दिवसांच्या आत आम्हाला ही परवानगी मिळू शकते. मे २०२५ पासून उड्डाणांना नियमित सुरुवात होणार आहे, असे अदानी एअरपोर्ट होल्डिंग लिमिटेडचे समूह मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण बन्सल यांनी सांगितले. देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय उड्डाणे घेणाऱ्या महत्त्वाच्या एअरलाइन्सशी आम्ही चर्चा करत असून प्रवाशांना उत्तमोत्तम सुविधा देण्याचे आमचे ध्येय आहे. अतिरिक्त प्रवाशांचा भार पेलण्यासाठी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्व सुविधांनी युक्त आहे. त्यामुळे मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील ताण कमी होईल,असेही बन्सल यांनी पुढे सांगितले. मुंबई आणि नवी मुंबई विमानतळामधील अंतर हे फक्त ३५ किलोमीटरचे असल्यामुळे मुंबईच्या रहिवाशांनाही नवी मुंबई विमानतळावरून प्रवास करण्यासाठी आम्ही अद्ययावत सोयीसुविधा उपलब्ध केल्या आहेत. त्यामुळे हे विमानतळ प्रवाशांसाठी आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरणार आहे. प्रवाशांचा आनंद द्विगुणित करण्यासाठी आम्ही उच्च दर्जाच्या सुविधा उभारल्या आहेत. त्यामुळे उड्डाण घेण्यासाठी प्रवाशांची तोबा गर्दी उसळली तरी आम्हाला कोणतीच अडचण येणार नाही, असा विश्वास विमानतळ व्यवस्थापनाकडून व्यक्त करण्यात आला आहे. अदानी समूहाने २०२१ मध्ये नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर एक नियंत्रक हिस्सा विकत घेतला. जून २०२२ मध्ये सिडकोने बांधकाम सुरू करण्यासाठी २८६६ एकर जमीन अदानी समूहाला सुपूर्द केली. सिडकोनेही ५ हजार कुटुंबांच्या पुनर्वसनाचे नियोजन केले आहे. नवी मुंबई विमानतळाचे भूसंपादन २०१९मध्ये पूर्ण झाले, मात्र प्रकल्पामुळे बाधित झालेल्या लोकांच्या पुनर्वसनासाठी अनेक आव्हाने होती. त्यामुळे सिडकोने पुढील चार वर्षांत अदानी समूहाच्या मदतीने प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन केले. सप्टेंबर २०२३ मध्ये, इंटरनॅशनल एअर ट्रान्सपोर्ट असोसिएशनने (आयएटीए) नवी मुंबई विमानतळाला एनएमआय कोड प्रदान केला. ऑगस्ट २०२४ मध्ये, भारतीय विमानतळ प्राधिकरणाने त्याच्या इन्स्ट्रुमेंट लँडिंग सिस्टीमसाठी (आयएलएस) फ्लाइट कॅलिब्रेशनची चाचणी घेतली. विमानतळाचा परवाना देण्यापूर्वी आणि कार्यान्वित करण्यापूर्वी आयएलएस चाचणी करणे ही एक महत्त्वाची प्रक्रिया होती. मुंबई महानगर प्रदेशातील दुसरे आंतरराष्ट्रीय विमानतळ असलेल्या नवी मुंबई विमानतळाच्या उभारणीला मार्च २००८ मध्ये सुरुवात झाली. अडीच वर्षांपूर्वी महायुतीचे सरकार आल्यानंतर विमानतळाच्या कामाने वेग घेतला. ऑक्टोबर १०३४ मध्ये या प्रक्रियेने एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला. भारतीय वायुसेनेच्या विमानाने या विमानतळावर ट्रायल लँडिंग यशस्वीरीत्या पार पाडले. चाचणी लँडिंगमुळे अभियंते आणि विमान वाहतूक अधिकाऱ्यांना कामगिरी आणि विमानतळाच्या तयारीचे मूल्यांकन करण्याची परवानगी मिळाली. ११ ऑक्टोबर २०२४ रोजी भारतीय वायुदलाच्या सी२९५ या विमानाची यशस्वी चाचणी घेण्यात आली होती. वायुदलाच्या अनुभवी चालकांनी ही मोहीम यशस्वीपणे राबवली होती. आता व्यावसायिक विमानाचे यशस्वी लँडिंग झाल्याने रितसर विमानसेवेची सुरुवात होण्यास कुठलीही आडकाठी नाही. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची दरवर्षी २० दशलक्ष प्रवाशांना हाताळण्याची क्षमता आहे. येथून दरवर्षी २.५ दशलक्ष टन कार्गो वाहतूक होईल. पनवेलपासून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ १० मिनिटांच्या अंतरावर आहे. या विमानतळावर रस्ता, मेट्रो रेल्वे आणि उपनगरीय रेल्वेमार्गे सहज पोहोचता येईल. विमानतळ नवी मुंबई मेट्रो लाईन १ आणि मुंबई मेट्रो लाईन ८ ला जोडते, ज्याला गोल्ड लाईन देखील म्हणतात. हे विमानतळ मुंबई–हैदराबाद हाय– स्पीड रेल्वे कॉरिडॉरचा प्रारंभ बिंदू असेल. तसेच शिवडी–न्हावा–शेवा–ट्रान्स–हार्बर सी लिंक किंवा एमटीएचएल येथून विमानतळावर सहज प्रवेश करता येईल. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ एरोट्रोपोलिसमुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळेल आणि नवी मुंबईत लाखो रोजगारांच्या संधी निर्माण होतील. विमानतळाचा सर्वात मोठा फायदा नवी मुंबईच्या रिअल इस्टेटला, विशेषतः पनवेलला झाला आहे. मुंबईच्या विपरीत, नवी मुंबईच्या आसपासचा बहुतांश विकास हा ग्रीनफिल्ड असेल. त्यात रुंद रस्ते, फुटपाथ, चांगला ड्रेनेज आणि सांडपाणी व्यवस्था आदी पायाभूत सुविधा नियोजित पद्धतीने तयार केल्या जातील. विमानतळ कार्यान्वित झाल्यानंतर येथील जागांच्या किमती १० ते १५ टक्क्यांनी वाढण्याची शक्यता आहे. विमानतळामुळे पनवेल, उलवे, कामोठे, खारघर आणि तळोजा या प्रमुख बाजारपेठांना फायदा होईल. हे सर्व क्षेत्र मिळून तिसरी मुंबई बनते. नवी मुंबई विमानतळामुळे पनवेलचा नवी मुंबईतील व्यावसायिक हॉटस्पॉट म्हणून उदय होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

## ध्यास : सामाजिक संवेदना जागृत करणा–या कविता!

प्रा. डॉ. सुशील सातपुते या माझ्या वर्गमित्राचा मध्यासफ हा पहिला कवितासंग्रह मराठवाड्याला समृद्ध करणा–्या मांजरा या नदीचे नाव असणा–्या मांजरा प्रकाशनाकडून प्रकाशित करण्यात आला आहे.

२००२ साली नव्यानेच सुरू झालेल्या परभणी येथील राजीव गांधी कृषी महाविद्यालयात बीएस्सी कृषीला मी प्रवेश घेतल्यानंतर सुशीलशी माझी ओळख झाली. आम्ही दोघे तत्कालीन वर्गमित्र. मला व सुशीलला महाविद्यालयीन शिक्षण घेतानाच कवितेचा छंद होता. आज तो वृद्धिंगत झाला आहे.

डॉ. सुशील सातपुते यांच्या मध्यासफ कवितासंग्रहात एकूण सदुसष्ट कविता आहेत. समाजातील विविध स्तरांतील लोकांच्या समस्या कवीला अस्वस्थ करतात. कवीची संवेदनशिलता स्वस्थ बसू देत नाही आणि मग पुढे कवितेची निर्मिती होते. अनेक घटना व प्रसंग कवितेचे रूप धारण करू लागतात. स्त्री असो किंवा पुरुष, जीवनात अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. त्यांची कथा आणि व्यथा कवितेतून मांडली जाणे गरजेचे आहे. त्यासाठी सुशीलने कवितेचा मध्यासफ घेतला आहे. त्याची कविता वंचितांचा आवाज होऊन येते आहे; याचा आनंदच आहे. सुशीलचे वडील भारत सातपुते हे प्रसिद्ध साहित्यिक आहेत. त्यांचे अनेक कवितासंग्रह, वात्रटिकासंग्रह, कथासंग्रह प्रकाशित आहेत. सध्या त्यांचे गाजत असलेले मजागरणफ हे कादंबरीवजा आत्मचरित्र नुकतेच प्रकाशित झालेले आहे. सुशीलच्या आईचाही मऊनसावलीफ नावाचा कवितासंग्रह प्रकाशित आहे. त्याम ुळे मसुशीलच्या रक्तातच कविता आहेफ, असे म्हणता येईल. आई–वडिलांची प्रेरणा घेऊन तो कविता लेखनाची वाटचाल करीत आहे. एका अर्थाने तो त्यांचा मसाहित्यिक वारसाफ पुढे चालवत आहे, असेही म्हणता येईल! सध्या तो एका नामांकित कृषी महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक पदावर कार्यरत आहे. त्याला कविता म्हणजे माणसांना जोडणारा धागा वाटतो. एकत्र कुटुंबात जन्मलेल्या सुशीलला आजीने धान्याचे दळण दळताना म्हटलेल्या जात्यावरील ओव्यांमधून कविता कळू लागली व ती आवडू लागली.

सुशीलच्या कवितेतून समाजहिताचे सूर उमटताना दिसतात. सामाजिक न्याय व सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय सेवावृत्तीचा मध्यासफ जाणवतो. सुशीलची कविता समकाळाशी एकरूप होताना दिसते. जुन्या स्मृतींना उजाळा देत नव्याचा मध्यासफ घेत पुढे वाटचाल सुरू ठेवण्यासाठी सुशीलच्या कवितेची आपल्याला नक्कीच मदत होणार आहे. सुशीलच्या कवितेला कोणतेच विषय वर्ज्य नाहीत. जातीपातीच्या भिंती तोडून नवा समाज निर्मिण्यासाठी ही कविता आपली स्पष्ट भूमिका घेऊन पुढे येताना दिसत आहे. माणसाला माणसात आणणारी ही कविता काळाच्या ओघात लुप्त होणार नाही याची खात्री आहे. शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी व समस्त स्त्री– पुरुषांच्या हिताची, कल्याणाची मागणी करण्यात ही कविता कुठेही कमी पडत नाही; हे लक्षात घ्यावे लागेल. त्यासाठी हा कवितासंग्रह वाचणे महत्त्वाचे आहे.

राष्ट्रीय एकात्मता जपण्यासाठी समाजात विषमता नष्ट करणे आवश्यक आहे आणि ती नष्ट करायची असेल तर सुशीलची मजातफ ही कविता महत्त्वाची भूमिका बजावते; असे म्हणता येईल. तो म्हणतो,

बरं झालं,
जवानांच्या रक्तात
उतरली नाही जात...
बरं झालं डॉक्टरनं
मिरवली नाही जात...
अनब शेतक–्यांनी
शेतात पेरली नाही जात...

वाचक नक्कीच सूज्ञ आहेत. कवीला या कवितेतून काय सांगायचे आहे? ते त्यांच्या लक्षात येईलच, असे मला वाटते.

नातीगोती, प्रेम, माणुसकी, राजकारण, समाजकारण, शिक्षण, रस्ते, पाणी, वीज, शेती आणि ग्रामीण व शहरी भागातील समस्या, यांनाही सुशीलने आपल्या कवितेत महत्त्वाचे स्थान दिले आहे. सध्याचं प्रेम, रेव्ह पार्टी, समृद्धी महामार्गाचे अपघात, आजचं राजकारण, चित्रपट, परिषदा अनब चर्चा, बेरोजगारी, विविध डिजिटल समाजमाध्यमांवरील आजच्या तरुणाईचा कल, यांवरही मध्यासफमधील कविता भाष्य करताना दिसून येते.

श्रद्धा–अंधश्रद्धा, महात्मा गांधींची शिकवण (सत्य, अहिंसा, प्रेम, आध्यात्म) या सगळ्या गोष्टींचा समावेश सुशीलच्या कवितेत आढळून येतो. सामाजिक सुरक्षा व्यवस्था, उच्च ध्येयवादाची गरज, समता, बंधुता, लोकशाही, स्वातंत्र्य आणि जबाबदा–्यांची जाणीव सुशीलने त्याच्या कवितांमधून व्यक्त केली आहे.

ऊसतोड मजुरांच्या कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाची समस्यादेखील कवीने आपल्या कवितेतून मांडली आहे. ऊसतोड मजुराच्या मुलाची शिक्षणाप्रती असलेली तळमळ, आपल्या गरिबीचे चटके व अज्ञान दूर करण्यासाठी शिक्षणाची गरज व्यक्त करताना कवी म्हणतो,

पिढ्यानब पिढ्या ऊसाचा फड
डोईवर मोळीचा भार आहे
माय मी पाहिली तुझी धडपड
मनाला कोयत्याचा वार आहे

मोठा होईन शिकून शाळा
जाऊ दे मला शाळेला
कष्टाची जाणीव हाय मला
गोडी येईल जगण्याला

आई–वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून पुढची पिढी सुशिक्षित व सधन करण्यासाठी साक्षरतेची गरज आहे. समाजातील तळागाळतील वर्गांपर्यंत शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली जाणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्वांनी मुला–मुलींना शाळेत पाठवणे आवश्यक आहे; ही भावना व्यक्त करण्यासाठी कवीने मगोडी येईल जगण्यालाफ या कवितेतून आपले विचार मांडले आहेत.

स्त्रियांवरील अन्याय, लैंगिक अत्याचार व शोषणाच्या विरोधात सुशीलची कविता प्रकर्षाने उभी राहते. तो म्हणतो,

निर्भया, प्रियंका, कोपर्डी
अंकिताचा हा हिंगणघाट
स्त्रीला जाळणारी ही लाट
कलंकीत रोज नवीन वाट

# रेल्वे आली हो..खा..बजरंग सोनवणेंच्या पाठपुराव्याने रेल्वेने धरली महायस्पीड

## विघनवाडी–नवगण राजुरी लोहमार्गावर रेल्वेची चाचणी, रेल्वे कृती समिती, बीडकरांकडून खा.सोनवणेंचा रेल्वेस्थानकावरच सत्कार

बीड: लोकसभा निवडणूकीच्या निकालानंतर खा.बजरंग सोनवणे यांनी पहिली बैठक रेल्वे अधिका–्यांची घेत डिसेंबर २०२४ अखेर बीडच्या हद्दीत रेल्वे आलीच पाहिजे, असे आदेश दिले होते. यानंतर रेल्वेच्या कामाला गती देण्यासाठी पाठपुरावा केला आणि दि.३० रोजी खा.बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत विघनवाडी ते नवगण राजुरी या २४.५ किलोमिटरच्या लोहमार्गावर रेल्वेची हासस्पीड चाचणी घेण्यात आली.

गेल्या चाळीस वर्षांपुर्वी अहमदनगर–बीड–परळी रेल्वेमार्गासाठी लढा उभा राहिला. यानंतर १९९५ मध्ये या मार्गाला मंजुरी मिळाली. परंतु प्रत्यक्षात कामाला म्हणावी तशी गती मिळाली नाही. गती न मिळण्याला येथील लोकप्रतिनिधींही जबाबदार होते. त्यांच्याकडून आवश्यक पाठपुरावाही झाला नाही, असे बोलले जाते. मागील काही वर्षात रेल्वेने बीड जिल्ह्यात प्रवेश केला. लोकसभा निवडणूकीत खा.बजरंग सोनवणे यांनी आपण जिल्ह्याच्या जिव्हाळ्याचा विषय असलेल्या रेल्वेसाठी सर्वोत्परी प्रयत्न करू, असा शब्द दिला होता. लोकसभा निवडणूकीच्या निकालात खा.बजरंग सानवणे यांना विजय झाला. विजयाने हुरळून न जाता आणि सत्काराचे हारतुरे स्विकारत न बसता दुस–्याच दिवशी रेल्वे अधिका–्यांची खासदार म्हणून पहिली बैठक घेतली. याच बैठकीत




डिसेंबर अखेर रेल्वे बीडच्या हद्दीत यायला हवी, असे आदेश दिले. त्यानुसार रेल्वे कंत्राटदार आणि अधिक–्यांनी अंमळनेरच्या पुढील कामाला गती दिली. यानंतर काहीच कालावधीत अंमळनेर ते विघनवाडी या मार्गाचे काम पुर्ण करून जलदगती रेल्वेची चाचणी घेण्यात आली. तर दि.३० डिसेंबर रोजी खा.बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत विघनवाडी ते नवगण राजुरी या जलदगती रेल्वे मार्गावर रेल्वेची हायस्पीडचाचणी घेण्यात आली. यावेळी खा.सोनवणे यांनी रेल्वेला हिरवी झेंडी दाखवली. याच बरोबरपुष्पहार घालून रेल्वे गाडीची पुजा केली. आज दि.३१ डिसेंबर रोजी देखील रेल्वेची हायस्पीड चाचणी घेण्यात येणार आहे.

मागील आठवड्यात खा.बजरंग सोनवणे यांनी रेल्वेच्या कामाला गती देण्यासाठी आणि रेल्वे कामात येणा–्या अडचणी सोडविण्यासाठी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव व रेल बोर्डाचे चेअरमन सतिषकुमार यांची भेट घेवून समस्या मांडल्या होत्या. केंद्रीय मंत्री आणि रेल बोर्डाचे चेअरमन यांनी येणा–्या अडचणी सोडविण्याचे आश्वासन दिले होते. त्यानूसार अनेक विषय मार्गीही लागत आहेत. दि.३० रोजी दुपारी अडीच वाजता खा.बजरंग सोनवणे हे नवगण राजुरी येथील रेल्वेस्थानकाच्या ठिकाणी पोहचले होते. याठिकाणी स्वातंत्र्य सैनिक रेल्वे मागणी आंदोलन समितीचे जेष्ठ सदस्य सत्यनारायण लाहोटी, अध्यक्ष जवाहरलाल सारडा, शांतीलाल पटेल, सदस्य सुनील क्षीरसागर, अशोक शेटे, सुरेश मेखे, गोविंद कासट यांनी खा.बजरंग सोनवणे हे रेल्वे कामासाठी योग्य पाठपुरावा करत असलेबाबत सत्कार करून शाबासकीची थाप दिली. यावेळी खा.बजरंग सोनवणे यांच्यासोबत दत्तात्रय (पिंटू) ठोंबरे, भाऊसाहेब गुंड, बालासाहेब जाधव, सय्यद शरीफ, सुरज पटाईत, बबन जाधव, गुलाब पठाण, शद्दु शतीफ, भागवत तावरे, रेल्वचे अधिकारी यादव, लोळगे, नाईक, कुवर, अकेला, श्रीवास्तव आणि कंत्राटदार श्रीराम कंन्स्ट्रकशनचे अमित पेंसलवार यांची उपस्थिती होती.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
बुधवार १ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



# पत्रकारितेत उल्लेखनीय कार्यासाठी आयेशा शेख यांना पुरस्कार जाहीर



बीड । प्रतिनिधी राष्ट्रमाता जिजाऊ आणि सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त तुलसी शैक्षणिक समूहाच्या वतीने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा गौरव करण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. या विशेष कार्यक्रमात माध्यम क्षेत्रातील दैदिप्यमान कार्याबद्दल आयेशा शेख यांना पत्रकारितेत उल्लेखनीय कामगिरीबद्दल पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. हा सन्मान सोहळा ४ जानेवारी २०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, संत ज्ञानेश्वर नगर, शासकीय आयटीआय मागे, बीड येथे संपन्न होणार आहे.आयेशा शेख यांना मिळालेल्या या सन्मानामुळे सर्वत्र त्यांच्या कार्याचे कौतुक होत असून, त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. समाजातील महिलांना प्रेरणा देण्यासाठी आयोजित या कार्यक्रमाला महिलांच्या उत्स्फूर्त सहभागाची अपेक्षा आहे

## तुरीच्या एका झाडाला सरासरी तब्बल १४०० शेंगा; निंबर्गीच्या या शेतकऱ्याने घेतले बंपर उत्पादन



सोलापूर : राजकारणात राहिल्याने शेतीकडे दुर्लक्ष होते, ही कल्पना निंबर्गीच्या गंगाधर बिराजदार यांनी खोटी ठरवली आहे. त्यांनी तुरीचे बंपर उत्पादन घेतले आहे. कृषी दिनानिमित्त पुणे येथील कृषी महाविद्यालयात केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्याविषयी गौरवोद्गार काढले आहेत. दक्षिण सोलापूर तालुक्यातील निंबर्गीचे गंगाधर बिराजदार हे प्रयोगशील शेतकरी आहेत. द्राक्षासह ते विविध पिके घेतात. यंदाच्या खरिपात त्यांनी गोदावरी जातीच्या तुरीच्या वाणाची लागवड केली होती. सुधारित तंत्रज्ञानाचा वापर केल्याने तुरीच्या एका झाडावर साधारणपणे १२०० ते १४०० शेंगा लागल्याचे दिसून आले. संपूर्ण झाड तुरीच्या शेंगांनी लगडलेले असल्याने एकरी १४ ते १५ क्विंटल उत्पादनाची अपेक्षा आहे. यासाठी कृषी विज्ञान केंद्राचे डॉ लालासाहेब तांबडे, अमोल शास्त्री, आॅजारी, कृषी सहायक अशोक राठोड यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. गंगाधर बिराजदार यांनी यापूर्वी तुरीचे विक्रमी उत्पादन घेऊन राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाचा पुरस्कार पटकावला आहे. द्राक्ष उत्पादनात ही त्यांनी विक्रम प्रस्थापित केला आहे. गंगाधर बिराजदार राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत असतात. सध्या ते ब्रह्मदेव दादा माने सहकारी बँकेचे संचालक आहेत. शेतीवर त्यांची अपार श्रद्धा आणि निष्ठा आहे.

# मंत्री पंकजाताई आणि डॉ.प्रितमताईंनी जिल्ह्यात पारदर्शी, स्वच्छ कारभार करुन विकासकामे करुन दाखविली-सलीम जहाँगीर

बीड । प्रतिनिधी विकास काय असतो हे पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे आणि बीड जिल्ह्याच्या माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे यांनी अख्ख्या जिल्ह्याला दाखवून दिले आहे. गेल्या काही वर्षात अगदी स्वच्छ प्रतिमा, पारदर्शी कारभार आणि विकासाचे व्हिजन समोर ठेवून मुंडे भगिनींनी बीड जिल्ह्याची सेवा केलेली आहे. निस्वार्थ भावनेने केलेल्या जनसेवेचे फलित आणि जिल्हावासियांच्या आशीर्वादामुळेच पंकजाताई राज्याच्या कॅबिनेट मंत्री पदी विराजमान झाल्या आहेत. पंकजाताई आणि जिल्ह्याच्या माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे यांनी गेल्या दहा वर्षात केलेला पाठपुरावा आणि देशाचे पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांनी दिलेल्या निधीमुळेच आज बीड जिल्हा वासियांचे रेल्वेचे स्वप्न प्रत्यक्षात पूर्ण होत आहे. रेल्वेचे श्रेय हे मोदी सरकार आणि मुंडे भगिनींचेच आहे, त्यामुळे कोणीही अर्ध्या हळकुंडात पिवळे होत त्याचे श्रेय घेण्याचा प्रयत्न करू नये असे भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे महामंत्री सलीम जहाँगीर



यांनी म्हटले आहे. बीड जिल्ह्यात गेल्या काही वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणावर विकास झाला आहे. पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी , केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून पंकजाताई आणि प्रीतमताई मुंडे यांनी दूरदृष्टी ठेवून विकास केला. जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग, राज्यमार्ग या महत्वाच्या कामाबरोबरच बीड शहरातील नगर रोड ते तेलगाव रोडचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. जिल्हा रुग्णालयातील अतिशय महत्वाच्या अशा २०० खाटांच्या स्त्री रुग्णालयाच्या भव्य दिव्य इमारतीचे काम अंतिम टप्प्यात आहे. त्यासाठी पंकजाताईंनी पाठपुरावा करून निधी मंजूर करून आणला आणि महत्वाचा प्रश्न मार्गी लावला. ग्रामविकास मंत्री असताना जिल्हाभरात ग्राम सचिवालये झाली. जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या इमारती देखील भव्य दिव्य स्वरूपात झाल्या. प्रीतमताईंमुळे बीडमध्ये पासपोर्ट कार्यालय झाले. पंकजाताई आणि प्रितमताई मुंडे यांनी जिल्ह्यात अतिशय पारदर्शी कारभार केलेला आहे.

## युसुफ वडगाव पोलीस ठाण्यात चार जणाविरुद्ध ॲट्रॉसिटी ॲक्ट अनुसार गुन्हा दाखल




केज । प्रतिनिधी केज तालुक्यातील बनसारोळा येथील चार जणाविरुद्ध युसुफ वडगाव पोलीस ठाण्यात ॲट्रॉसिटी ॲक्ट अनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुनम सुधाकर जोगदंड वय ३९ वर्षे व्यवसाय मजुरी रा. बनसारोळा ता.केज जि.बीड येथील रहिवाशी आहेत. पुनम जोगदंड त्यांचे पती सुधाकर जोगदंड, त्यांचा मुलगा संतोष व सून शिवानी असे मिळून त्यांचे कुटुंब वरील ठिकाणी राहत असून शेती करून त्यांच्या कुटुंबाची उपजीविका भागवत आहेत. दिनांक २९ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ८-३० वा. सुमारास पुनम जोगदंड या त्यांच्या घरी स्वयंपाक करत असताना त्यांच्या गावातील भारत बलभीम धायगुडे हा त्यांच्या घरासमोर लोखंडी गज घेऊन आला व पुनम जोगदंड यांना म्हणाला की, काल तुझ्या मुलाने माझ्या मुलाची शूटिंग कशासाठी काढली असे म्हणून पुनम जोगदंड यांना शिवीगाळ करू लागला. पुनम जोगदंड या भारत यास म्हणले की, काल झाला तो विषय संपला आज त्यावर काही बोलू नकोस व शिवीगाळ करू नकोस असे म्हणल्या असता त्यांच्या पाठीमागून नितीन भारत धायगुडे हा हातामध्ये कुऱ्हाड व पोपट भारत धायगुडे हा त्याच्या हातामध्ये कोयता घेऊन व भारत धायगुडे याची पत्नी शोभा ही तिच्या हातामध्ये लाकडी काटी घेऊन आली व शिवीगाळ करू लागले तेव्हा पुनम जोगदंड त्यांना काल झाला तो विषय संपला आज कशाला शिवीगाळ करता असे म्हणाले असता. भारत यानी पुनम जोगदंड यांच्या डाव्या पायाच्या मांडीवर त्याच्या हातामधील लोखंडी रॉडने मारहाण केली. यावेळी पूनम जोगदंड या खाली पडल्या असता पोपट यानी त्याच्या हातामधील कोयता त्यांच्या डाव्या हाताच्या मनगटा जवळ व डोक्यावर मारून जखमी केले. तेवढ्यात पूनम जोगदंड यांचा मुलगा व पती हे भांडणाच्या आवाजाने बाहेरून घरी आले. व भांडणाची सोडवासोडव करू लागले तेव्हा माझे पत्ती यांना नितीन धायगुडे यानी लोखंडे रॉडने त्यांच्या डाव्या हातावर मारून हात फॅक्चर केला व शोभा धायगुडे हिने पुनम यांच्या पतीच्या पाठीत काठीने मारहाण केली. पुनम जोगदंड यांचा मुलगा संतोष हा भांडणे सोडवण्यासाठी मध्ये आला असता त्याला नितीन यांनी लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. त्यांना आम्ही मातंग समाजाचे आहोत हे माहीत असताना ये मांगटयांनो तुमची लायकी आहे काय असे म्हणून जातीवाचक शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली आहे असे पुनम जोगदंड यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

## अखेर पिंपरनई येथील गणेशनगर वस्तीवरील ग्रामस्थांची चिखल तुडवीत होणारी पायपीट थांबणार ; पाणंद रस्त्यांचे काम सुरु :- डॉ.गणेश ढवळे



लिंबागणेशः- ( दि.३१ ) बीड तालुक्यातील पिंपरनई ग्रामपंचायत अंतर्गत गणेशनगर वस्तीवरील ग्रामस्थांची पावसाळ्यात चिखलातून होणारी पायपीट, मुलांच्या शाळा, बाजारहाट,दवाखाना आदी कामांसाठी पावसाळ्यात चिखल तुडवीत होणारी ससेहोलपट ग्रामपंचायतीच्या १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतुन रस्तकाम सुरू केल्याने थांबणार आहे. बेलेश्वर संस्थानचे मठाधिपती शांतीब्रम्ह तुकाराम महाराज यांच्या शुभहस्ते श्रीफळ फोडून कामाची सुरुवात करण्यात आली.यावेळी पिंपरनई सरपंच रतन सोनावणे,उपसरपंच बाळासाहेब वायभट, ग्रामसेवक सय्यद,वायभट,लिंबागणेशचे सरपंच बालासाहेब जाधव, अंजनवतीचे बाळासाहेब मोरे पाटील, पांडुरंग वाणी, विक्रांत वाणी गणेशनगर वस्तीवरील रविंद्र वायभट, विकास वायभट, अशोक वायभट,सौरभ वायभट, लक्ष्मण वायभट,आश्रुबा वायभट,रामप्रभु वायभट, महादेव वायभट, माऊली वायभट, नवनाथ मानकर आदी.

ग्रामस्थ उपस्थित होते.बीड तालुक्यातील मौजे. पिंपरनई ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत गणेशनगर वस्ती २५ वर्षांपासून वास्तव्यास असुन २५-३० घरांचा उंबरठा असलेल्या जवळपास १५० लोकसंख्या असलेल्या वस्तीवरील ग्रामस्थांची रस्ता नसल्याने पावसाळ्यात शालेय मुलांची शाळा,दुधदुभते, भाजीपाला, बाजारहाट आदि कामांसाठी पावसाळ्यात गुडघाभर चिखल तुडवीत जावे लागत असे.यारस्त्यासाठी गणेशनगर वस्तीवरील ग्रामपंचायत सदस्य कृष्णा वायभट यांनी शासनदरबारी पाठपुरावा केला.आणि अखेर सरपंच, उपसरपंच यांनी १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून रस्त्याचे काम सुरू केले आहे.

**रखडलेले मातोश्री ग्राम समृद्धी शेत/पाणंद रस्ते योजना सुरू करा :- डॉ.गणेश ढवळे**

ग्रामीण भागात शेतवस्तीवर जाण्यासाठी दळणवळणाची साधने व मजुरांच्या हाताला काम मिळावे या उदात्त हेतूने मातोश्री ग्राम समृद्धी शेत/ पाणंद रस्ते योजना अस्तित्वात आणली. मात्र शासकीय नियमांच्या कचाट्यात योजना सापडली असुन प्रसिद्धी माध्यमांद्वारे गाजावाजा करण्यात आलेल्या योजनेचे वास्तव क्लेशदायक आहे. शासकीय नियमांमुळे ग्रामस्थांना स्वखर्चाने रस्ते करण्याची वेळ आली आहे. बीड जिल्ह्यातील शासनाने मंजुरी दिलेल्या २०७४ कामांपैकी केवळ ४४८ कामेच म्हणजे २३ टक्केच कामे पूर्ण झाल्याने ग्रामीण भागात ही योजना मृगजळ ठरू पहात आहे.ग्रामीण भागातील शेतवस्त्यांवरील ग्रामस्थांना शाळा, दुधदुभते, भाजीपाला, बाजारहाट, शेतमाल वाहतुकीचा प्रश्न प्रलंबित आहे. दरवर्षी पेरणीसाठी बी बियाणे नेताना त्याचबरोबर पिक काढल्यानंतर शेतीमाल वाहतुकीसाठी रस्ता नसल्याने शेतकऱ्यांची अडचण होत असुन प्रलंबित पाणंद शेत रस्ता कामे तातडीने पूर्ण करण्यात यावीत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

# आळंदीत मराठा भूषण पुरस्काराने संतोष डावकर सन्मानित शेवटच्या श्वासापर्यंत समाजाप्रती समर्पण-संतोष डावकर

वडवणी । प्रतिनिधी मराठा समाजाच्या विविध आंदोलनामध्ये मागील अनेक वर्षांपासून हिरारीने सहभागी होवून कुठलीही व अजिबात कशाचीही अपेक्षा न ठेवता केवळ समाजाच्या हितासाठी तसेच न्याय व हक्कांसाठी दिवसरात्र वडवणीचे संतोष डावकर यांनी संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली काम केले असून त्यांच्या आजवरच्या याच कामाची दखल घेत अखिल भारतीय मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य व जगद्गुरु संत तुकाराम महाराज प्रतिष्ठानकडून मराठा समाजसेवक संतोष डावकर यांना मराठा समाज भूषण या पुरस्काराने श्रीक्षेत्र.आळंदी येथे मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार मिळाल्याने संतोष डावकर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. श्रीक्षेत्र.आळंदी देवाची, पुणे येथे अखिल भारतीय मराठा महासंघ व जगद्गुरु संत तुकाराम महाराज सामाजिक, अध्यात्मिक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील संत, महंत, ज्येष्ठ कीर्तनकार, संत साहित्याचे अभ्यासक, वारकरी शिक्षण संस्थांव्दारा ज्ञानदान करणाऱ्या गुरुजन, व निस्वार्थी समाजसेवा करणाऱ्या मान्यवरांचा देखील गौरव करण्यात आला आहे. यामध्ये वडवणी येथील मराठा समाजसेवक संतोष डावकर यांना देखील मराठा भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. हा सन्मान केंद्रिय सहकार राज्यमंत्री ना.मुरलीधर मोहोळ आणि माजी केंद्रिय मंत्री जयसिंगराव गायकवाड यांच्या शुभ हस्ते हा पुरस्कार देण्यात आला आहे. आजपर्यंत संतोष डावकर यांनी मराठा मुक मोर्चा, मराठा क्रांती मोर्चा, मराठा ठोक मोर्चा, शासनाचा जाहीर निषेध करण्यासाठी सामुदायिक मुंडण मोर्चा, रास्ता रोको आंदोलन, निदर्शने असे अनेक आंदोलन आणि संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या सर्व आंदोलनात अक्षरशः पायाला भिंगरी बांधून २४ तास फिरणारा त्यांच्या खांद्याला खांदा लावून मराठा समाजसेवक संतोष डावकर यांनी काम केलेले असून त्यांच्या समाजाप्रती असलेल्या याच निस्वार्थी कामाची पावती म्हणून त्यांचा या मराठा समाज भूषण पुरस्काराने गौरव करण्यात आलेला आहे. या पुरस्कारामुळे वडवणी तालुक्याची मान निश्चितच उंचावली असून संतोष डावकर यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात असून शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे. दरम्यान या पुरस्कारामुळे समाजाप्रती आपली असलेली जबाबदारी आणखीनच वाढली असून या पुरस्कारासाठी मी अखिल भारतीय मराठा महासंघ व जगद्गुरु संत तुकाराम महाराज सामाजिक, अध्यात्मिक प्रतिष्ठान यांचा आभारी आहे. मनोज जरांगे पाटील व सर्व ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली मराठा समाजाच्या आणि समाज बांधवांच्या न्याय व हक्कांसाठी आपला हा लढा असाच अविरतपणे सुरु राहणार असून जीवनाच्या शेवटच्या श्वासापर्यंत आपल्या आयुष्याचे समाजाप्रती समर्पणच राहील अशी ग्वाही संतोष डावकर यांनी पुरस्कार स्विकारल्यानंतर व्यक्त केली.

# दाढी-कटिंगसाठीचे २० टक्क्याने दर वाढविण्याचा नाभिक समाज बांधवांचा निर्णय -किशोर गाडेकर, सुनील दोडके

बीड दि.३१(प्रतिनिधी)-दिवसेंदिवस वाढत असलेली महागाई लक्षात घेऊन नाभिक समाज बांधवांनी दाढी आणि कटिंगच्या दरामध्ये २० टक्क्याने वाढ करण्याचा निर्णय नाभिक समाज बांधवांच्या व व्यवसायिकांची हॉटेल नीलकमल येथे दि. २८ डिसेंबर २०२४ रोजी घेण्यात आलेल्या बैठकीत घेतला आहे. ही नवीन दरवाढ आजपासून म्हणजेच ०१ जानेवारी २०२५ या नवीन वर्षापासून लागू करण्याचे सर्वानुमते ठरवण्यात आले आहे. मागील काही दिवसापासून जीवनावश्यक वस्तू सह विविध वस्तूंच्या भावत दिवसेंदिवस वाढ होत आहे. या वाढत्या महागाईचा
मोठा फटका सामान्य नागरिकांसह नाभिक व्यवसाय करणाऱ्या समाज बांधवांना होत आहे. त्यातच जीएसटी, इन्कम टॅक्स, प्रोफेशनल टॅक्स, सलून उपयोगी वस्तूंच्या दरात होणारी वाढ, वाढते वीज बिल, वाढत चाललेले कर्जाचे हप्ते या सर्व आर्थिक विवेंचनात सलून कारागीर अडकला आहे. एकंदरीत या सर्व बाबींचा विचार करता नाभिक समाज बांधव आणि सलून व्यवसायिकांना मोठा फटका बसत आहे. त्याच बरोबर अनेक अडिअडचणींचा आणि संकटांचा सामना नाभिक समाज बांधव व सलून व्यवसायिकांना करावा लागत आहे. आजच्या स्थितीत कित्येक व्यवसायिकांना आपला उदरनिर्वाह करण्याचा खर्च भागविणे अवघड होत चाललेले आहे. घरखर्च मुलांचे शिक्षण त्याचबरोबर वृद्ध आई-वडिलांचा



आजारपणाचा खर्च या सर्व बाबींचा खर्च भागविता भागविता नाभिक समाज बांधव सलून व्यावसायिक हैराण झाले आहेत.
शिवाय दर पाच वर्षाला नाभिक व्यवसाय समाज बांधव दाढी व कटिंगच्या दरात केवळ २० टक्के दरवाढ करत असतात. कोरोना महामारीच्या आधी म्हणजेच २०१९ मध्ये २० टक्के दरवाढ केली होती. त्यानंतर अद्याप भाव वाढ केलेली नाही. वाढती महागाई आणि पाच वर्षानंतर होणारी दरवाढ लक्षात घेऊन येत्या २०२५ या नवीन वर्षामध्ये दरवाढ करण्यासंदर्भात बीड शहरातील नाभिक समाज बांधव व व्यावसायिक बांधवांनी २८ डिसेंबर रोजी बीड शहरातील नीलकमल हॉटेलमध्ये नाभिक समाज बांधवांची आणि सलून व्यवसायिकांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत कटिंग आणि दाढीच्या दरामध्ये २० टक्क्याने भाव वाढ करण्याचा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. शिवाय यावेळी नवीन दरवाढीचे फलक प्रत्येकाने आपल्या दुकानात लावावे असेही ठरविण्यात आले. आज १ जानेवारी २०२५ या नवीन वर्षापासून बीड शहरातील सर्व सलूनमधील हेअर कट, शेविंग त्याचबरोबर इतर सर्व सौंदर्य प्रसाधन कामावरती २० टक्के दरवाढ करण्यात येणार आहे. याबाबत सलून व्यवसायिकांनी निर्णय घेतला आहे.

**महागाई वाढल्यामुळे दरवाढीचा निर्णय -किशोर गाडेकर, सुनील दोडके**

वाढत्या महागाईचा फटका सलून व्यवसायाला मोठा बसला आहे. नाभिक समाज बांधावर आर्थिक आपत्ती ओढावली. त्यामुळे अनेकांच्या दुकानाचे भाडे थकले.
सरकारकडून कसलीही मदत मिळत नाही. कोरोना महामारी नंतरच्या काळात अनेक दुकानांची भाडेवाढ झाली. फेशिअल, ब्लेड, क्रीम यासारख्या साहित्याच्या दरात १० ते २० टक्क्यांनी वाढ झाली. वीज बिल वाढले, त्यामुळे दाढी कटिंगच्या दरात २० टक्के वाढ करण्याचा नाईलाजाने निर्णय घ्यावा लागला असल्याचे मत नाभिक समाज संघटनेचे किशोर गाडेकर आणि बीड शहराध्यक्ष सुनील दोडके यांनी सांगितले.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार १ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



## खुंटेफळ आरोग्य केंद्रास ५ वाजता असते कुलूप, रुग्णांची हेळसांड



म्हसोबावाडी । प्रतिनिधी आष्टी तालुक्यातील कुंभेफळ येथील अतिशय निष्काळजीपणाचा प्रकार चालू असून कुंबेफळ गावातील संजय जगधने यांची मुलगी काजल सोमनाथ शेलार यांना २७ डिसेंबर.२०२४ रोजी सायंकाळी ५:५० वाजता प्रसूतीसाठी खुंटेफळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये घेऊन गेले असता सायंकाळी ६ सहा वाजता दवाखान्याचे कर्मचारी व वैद्यकीय अधिकारी असताना दवाखान्याला कुलूप होते. त्यामुळे त्या महिलेची राहत्या घरी प्रसूती झाली डॉक्टरांना कॉल केला असता डॉक्टरांनी बाळ मयत आहे का जिवंत आहे याची खात्री न करता फोन कॉल करून म्बुलन्स ड्रायव्हर यांना आधी सांगितले आष्टीला घेऊन जा नंतर परत फोन करून सांगितले नगरला घेऊन जा डॉक्टरांच्या हलगदरीपणामुळे त्या माता माऊलीला आपल्या बाळाला गमवावे लागले.असा भयंकर प्रकार झाला आहे.खुंटेफळ प्राथमिक आरोग्य केंद्र या परिसरातील गोरगरीब गरजू रुग्णांना सुविधा देण्याचे एकमेव सुविधा केंद्र आहे त्यामुळे गांभीर्याने विचार करावा, या आधी पण तालुका आरोग्य अधिकारी यांच्याकडे सरपंच यांनी या अगोदर तक्रार दाखल केली होती त्यावर काहीही क्शन घेतली नाही. वैद्यकीय अधिकारी यांचा मनमानी कारभार सुरू असून या गोष्टीकडे जिल्हा आरोग्य अधिकारी तालुका आरोग्य अधिकारी यांनी गांभीर्याने लक्ष द्यावे अशी लेखी मागणी कुंबेफळ गावचे सरपंच दिपक गाडे यांनी आ सुरेश धस व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे केली आह

# केज न्यायालयाबाहेर वाल्मिक कराड समर्थक आणि विरोधकांची गर्दी, पोलिसांचा लाठीचार्ज

### गर्दीला पांगवण्यासाठी पोलिसांकडून लाठीचार्ज करण्यात आला.

**बीड,/प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच बीड जिल्ह्यातल्या केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात वाल्मिक कराड याच्यावर देखील आरोप करण्यात आले होते. मात्र तो फरार होता. अखेर या घटनेच्या २२ दिवसांनंतर तो शरण आला आहे, त्याने पुण्यात सीआयडीसमोर शरणागती पत्कारली. त्यानंतर आता वाल्मिक कराड याला घेऊन सीआयडीचं पथक केजमध्ये दाखल झालं आहे. आज रात्री उशिरा या प्रकरणावर केजच्या न्यायालयात सुनावणी होणार आहे. मात्र त्यापूर्वी मोठी बातमी समोर आली आहे.



ती म्हणजे वाल्मिक कराड याचे समर्थक आणि विरोधकांनी केज कोर्टाच्या परिसरामध्ये मोठी गर्दी केली आहे. गर्दीला पांगवण्यासाठी आणि परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी पोलिसांकडून याठिकाणी सौम्य लाठीचार्ज करण्यात आला आहे. पोलिसांनी गर्दी पांगवण्यासाठी सौम्य लाठीचार्ज केला. सीआयडीचं पथक वाल्मिकी कराडला घेऊन केजमध्ये दाखल झालं असून या प्रकरणात आजच सुनावणी होणार आहे.

दरम्यान त्यापूर्वी केजमध्ये वाल्मिक कराडच्या समर्थकांची दादागिरी पाहायला मिळाली. कोर्टाच्या आवारातील गाड्या बाहेर काढण्यासाठी त्यांनी दादागिरी केली, त्यांनी कोर्टाच्या आवारातच न्यायालयांच्या कर्मचा–यांना धमकी दिल्याचं समोर आलं आहे.

वाल्मिक कराडच्या रिमांडवर आज कोर्टात सुनावणी होणार आहे. सीयआयडीकडून केज कोर्टात याबाबत शिफारस करण्यात आली होती. वाल्मिक कराडच्या रिमांडवर रात्री कोर्टात सुनावणी व्हावी अशी मागणी सीआयडीकडून करण्यात आली होती, ही मागणी कोर्टानं मान्य केली. सीआयडीचं पथक वाल्मिक कराडला घेऊन केजमध्ये पोहोचलं आहे. कोणत्याही क्षणी सुनावणीला सुरुवात होण्याची शक्यता आहे. कोर्टात काय निर्णय होणार याकडे आता सर्वांचं लक्ष लागलं आहे.

### दिवसभरात काय घडलं?

घटनेच्या २२ दिवसांनंतर वाल्मिक कराड हा आज पुण्यात सीआयडीला शरण आला. त्यानंतर त्याचं मेडिकल चेकअप झालं. वाल्मिक कराड यांच्या रिमांडवर आजच सुनावणी करा अशी विनंती सीआयडीकडून न्यायालयाला करण्यात आली होती. न्यायालयानं सीआयडीची ही मागणी मान्य केली. त्यानंतर आता कराडला केजमध्ये आणण्यात आलं आहे.

# महिलांनी स्वत:चे संरक्षण करण्यास स्वत: सक्षम व्हावे

पाटोदा । प्रतिनिधी पाटोदा येथील जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या अँटी रॅगिंग समितीच्यावतीने दिनांक ३० डिसेंबर २०२४ रोजी पाटोदा पोलीस स्टेशन च्या दामिनी पथकाने भेट दिली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सोमनाथ घाडगे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून दामिनी पथक, पाटोदा पोलिस स्टेशन येथील मा. श्री. रविंद्र उबाळे, मा. श्री. संजय पवार, मा. श्री. गहिनीनाथ गर्जे, मा. श्री. सचिन कोळेकर, तसेच डॉ. अशोक देवगुडे, प्रा. सतिश जरांगे यांची उपस्थिती होती. यावेळी अँटी रॅगिंग समितीच्या प्रमुख प्रा. ज्योती रकटे यांनी प्रास्ताविका मध्ये अँटी रॅगिंग कायद्याविषयी प्राथमिक माहिती सांगितली. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. श्री. रविंद्र उबाळे यांनी सर्व विद्यार्थ्यांना असे आव्हान केले की, महाविद्यालयात तसेच कुठेही छेडछाड होत असेल वा त्रास होत असेल तर घाबरू नका.आमच्या पोलीस हेल्पलाईन क्रं. ११२ वरती संपर्क करावा. तसेच मा. श्री. संजय पवार म्हणाले की, शहरातील बहुतेक शाळा व महाविद्यालयांत विद्यार्थिनींसाठी सुरक्षिततेचे वातावरण नसते. बाहेरून येणाऱ्या टवाळखोर मंडळींचा परिसरात धुमाकूळ सुरू असतो. कट्टे अथवा कॅम्पसच्या परिसरातील टोळक्यांकडून युवतींची छेडछाड केली जाते. ही समस्या लक्षात घेऊन महिलांनी स्वत:चे संरक्षण करण्यास स्वत: सक्षम व्हावे, महिलांनी अन्यायाबाबत थेट दामिनी पथकाकडे तक्रार करावी, असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय समारोपामध्ये प्राचार्य डॉ. सोमनाथ घाडगे म्हणाले की, महिलांवरील अत्याचाराचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहे. विद्यार्थिनींसाठी सुरक्षिततेचे वातावरण नसते. काही महिला तक्रार करण्यास टाळाटाळ करतात. त्यामुळे छेडखानी करणाऱ्यांची हिंमत आणखी बळावते. अशा काही समस्या असल्यास निर्भयपणे विद्यार्थिनीने दामिनी पथकीशी संपर्क साधवा तसेच महाविद्यालयीन स्तरावर अँटी रॅगिंग समितीला लेखी कळवावे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बंडू लोखंडे यांनी केले तर आभार डॉ. वंदन जाधव यांनी मानले. या कार्यक्रमाला प्राध्यापकवृंद, विद्यार्थी तसेच विद्यार्थ्यांनी उपस्थित होते.

## शस्त्रांची गरज नसणाऱ्यांचे परवाने रद्द करणार



बीड । प्रतिनिधी शस्त्रांच्या बाबतीत जेवढ्या जणांना शस्त्र बाळगण्याबाबत परवानगी दिली आहे त्या सर्व फाईल्सची चौकशी सुरु आहे. शस्त्र प्रकरणात ज्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे त्यांच्यावर कारवाई सुरु आहे. याबाबत माझी जिल्हाधिका–यांसोबतही चर्चा झाली. शस्त्रांची गरज कितपत आहे या अनुषंगाने शस्त्रांचा परवाना राहू द्यायचा की नाही, शस्त्राची खरंच गरज आहे की नाही, याचे ॲनेलिसिस सध्या सुरु आहे. ज्या लोकांना गरज नाही त्यांचे परवाना रद्द होणार असल्याची माहिती सोमवार दि. ३० डिसेंबर रोजी बीड जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी प्रसारमाध्यमांना दिली. बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा सीआयडीकडून तपास सुरु आहे. आमदार सुरेश धस यांनी आज एसपी नवनीत कॉवत यांची भेट घेतली. यानंतर आता एसपी नवनीत कॉवत यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. शस्त्रांच्या सर्व फाईल्सचा तपास सुरु असून शस्त्र देण्याचा अधिकार जिल्हाधिकारी कार्यालयाकडे असतो. पोलिस कायदा आणि सुव्यवस्थेच्या हिशोबाने ॲनालिसिस करते. संबंधित व्यक्तीची पास्ट हिस्ट्रीचा हिशोबाने प्रत्येक फाईलची आम्ही ॲनालिसिस करणार. जिथे शस्त्राची गरज नाही तिथे आम्ही तशी शिफारस करणार, अशी प्रतिक्रिया एसपी नवनीत कॉवत यांनी दिली. मी सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रेस रिलीज काल जाहीर केली होती. सोशल मीडियावर बंदुकीसह व्हीडीओ किंवा फोटो शेअर करु नका, जेणेकरुन त्यामुळे दहशत निर्माण होईल असे मी तरुणांना आवाहन केले आहे. या प्रकरणी तीनचार गुन्हे दाखल केले आहेत. त्यांचे पिस्तूलीचे परवाने रद्द करण्याचा प्रस्तावही आम्ही पाठवला आहे. अशा प्रकारची कुठलीही पोस्ट टाकू नका. कारण पोलिसांपर्यंत ती पोस्ट पोहोचली तर कठोर कारवाई केली जाईल असे आवाहन नवनीत कॉवत यांनी केली. यावेळी नवनीत कॉवत यांना सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांना आलेल्या मेसेजबाबतही प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी प्रतिक्रिया दिली. अंजली दमानिया यांनी जेव्हा आम्हाला माहिती दिली होती त्याची आम्ही सखोल चौकशी केली. या तपासातून निष्पन्न झाले की, एका व्यक्तीने दारु पिवून त्यांना मेसेज पाठवला होता असे स्पष्टीकरण नवनीत कॉवत यांनी दिले. सध्या तपास सीआयडीकडून तपास सुरु आहे. सीआयडीला बीड पोलिसांची जेव्हा आणि जशी मदत लागते तशी मदत पोलिसांकडून दिली जाते अशी प्रतिक्रिया जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दिली.




## डोंगरगण येथे विजेच्या धक्क्याने शेतकऱ्याचा जागीच मृत्यू

आष्टी । प्रतिनिधी स्वतःच्या शेतात पिकाला पाणी देऊन झाल्यावर विद्युत पंप बंद करण्यासाठी गेल्यानंतर स्टार्टरला हात लावताच विद्युत प्रवाहाचा धक्का बसल्याने तरुण शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला. ही घटना (दि.३०) सोमवारी सकाळी साडे अकरा च्या दरम्यान डोंगरगण येथे घडली. संदिप मुरलीधर कर्डिले (वय ४२) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. आष्टी तालुक्यातील डोंगरगण येथील शेतकरी संदिप मुरलीधर कर्डीले हे स्वतःच्या शेतात पिकाला पाणी देत होते. पाणी देऊन झाल्यानंतर विद्युत पंप बंद करतांना त्या स्टार्टर मध्ये विद्युत प्रवाह उतरल्याने त्याचा धक्का बसून संदीप दूर फेकला गेला यातच त्याचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात आई, भाऊ, पत्नी, मुलगा, मुलगी असा परिवार आहे. संदीप नेहमी सामाजिक कामात अग्रेसर असायचा गावातील सर्व लोकांशी त्याची ऋणानुबंध संबंध होते. त्याची मृत्यूची निधन वार्ता समजताच गावं तसेच परिसरात हळहळ व्यक्त होत आहे

## राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता प्रगती अभियान

### प्रस्तावासाठी ५ जानेवारीपर्यंत मुदतवाढ




आष्टी दि.३० (प्रतिनिधी): पिकाला पाणी देऊन झाल्यावर विद्युत पंप बंद करण्यासाठी गेले असता स्टार्टरला हात लावताच विद्युत प्रवाहाचा धक्का बसल्याने तरूण शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला. ही घटना आज, सोमवारी सकाळी साडेअकराच्या दरम्यान डोंगरगण येथे घडली. संदीप मुरलीधर कर्डीले ( ४२) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,आष्टी तालुक्यातील डोंगरगण येथील शेतकरी संदीप मुरलीधर कर्डिले (४२) हे सोमवारी सकाळी साडेअकराच्या दरम्यान स्वत:च्या शेतात पिकाला पाणी देत होते. पाणी देऊन झाल्यावर विद्युत मोटार बंद करताना स्टार्टरमध्ये विद्युत प्रवाह उतरल्याने त्याचा धक्का बसून संदीप दूर फेकल्या गेले. यातच त्यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात आई, भाऊ, पत्नी, मुलगा, मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या मृत्यूची वार्ता समजताच गावात हळहळ व्यक्त होत आहे.

# मोबाईल वापराचा अतिरेक हे व्यसनच: सौ. चंदा गोलेकर



खर्डा ( प्रतिनिधी ) कोणत्याही गोष्टीचा अतिवापर हा ती गोष्ट घातक ठरण्यास कारणीभूत होऊ शकते. मोबाईल व्यक्तीला संपर्क ठेवायला उपयोगी म्हणून वापरायला सुरुवात झाली आणि हळूहळू अद्यावत झालेल्या मोबाईलने जगाला व्यापून टाकले,
यामुळे मानसिक ताण, ग्रहण शक्ती कमी होणे, व्यक्ती अति आक्रमक होणे, एकाग्रता जाणे आदी विविध समस्यांना सामोरे जात आहे. यासाठी परस्पर संवाद तसेच आवश्यक असेल तरच मोबाईलचा वापर करावा असे प्रतिपादन श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाच्या संचालिका सौ. चंदा गोलेकर यांनी आपल्या उद्घाटन पर भाषणात व्यक्त केले. मौजे. पांढरेवाडी ता. जामखेड. जि. अहिल्यानगर येथे श्री संत गजानन महाविद्यालय व श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे दिनांक ३१ रोजी या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या शिबिरात मयुथ फॉर माय भारतफ तसेच मयुथ फॉर डिजिटल लिटरसीफया संकल्पनेतून युवा जागरूकता, डिजिटल साक्षरता व युवक, स्वच्छ भारत अभियान, कॅशलेस जागरूकता, मृदा व जलसंवर्धन, रोगनिदान शिबिर, व्यसनमुक्ती जनजागृती आदी विशेष उपक्रम घेतले जाणार आहेत. या कार्यक्रमासाठी उद्घाटक म्हणून संस्थेच्या संचालिका सौ. चंदा गोलेकर, अध्यक्ष म्हणून महाविद्यालय प्राचार्य प्रा. डॉ. चंद्रसेन आवारे, प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालय विकास समितीचे उपाध्यक्ष. प्रकाश गोलेकर, सौ. सीमा दराडे, भगवान दराडे, प्रा. कुलकर्णी वैशाली आदी लाभले, यावेळी प्राचार्य प्रा. चंद्रकिशोर बारटक्के, रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. भारत मेंगडे, प्रा. मोहसीन शेख आदी याप्रसंगी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. मोहसीन शेख, सूत्रसंचालन प्रा. शिवानंद जाधव यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. नकुल खवले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे सचिव डॉ. महेश गोलेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com